| | | | |
|---|---|---|---|
| MHRT050010102021 | दाखल तारीख | – | २५/१०/२०२१ |
| | नोंदणी तारीख | – | २५/१०/२०२१ |
| | निकाल तारीख | – | ०६/०७/२०२६ |
| | कालावधी | – | वर्षे, महिने, दिवस<br>०४ ०८ १२ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२ खेड यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी – श्री.एस.एस.मुलाणी)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६४७/२०२१ निशाणी क्र.१७**

गुन्हा नोंद क्र.६९/२०२१, खेड पोलीस ठाणे, खेड

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस निरीक्षक,<br>खेड पोलीस ठाणे, खेड,<br>ता. खेड, जि. रत्नागिरी. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. आर. डी. जाधव – सहा.सरकारी वकील. |
| आरोपी | १. | अजित गंगाराम मोहिते,<br>वय –४० वर्षे,<br>रा. खोपी बौध्दवाडी,<br>ता. खेड, जि. रत्नागिरी. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | अॅड. एस. एस. शेठ |

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २६/०३/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २६/०३/२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २५/१०/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :- | २६/०९/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २२/०८/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अजित गंगाराम मोहिते | -- | २६/०९/२०२२ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | -- | |

## न्यायनिर्णय

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे शिक्षापात्र आरोप ठेवून खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे असे की,**

०२. दिनांक २६/०३/२०२१ रोजी फिर्यादी हे खेड पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस दूरक्षेत्र आंबवली येथे हजर असताना त्यांना मौजे खेड ते शिंदी जाणारे डांबरी रोडवर खोपी गावी चक्रवती नदीकिनारी झाडांचे आडोशाचा फायदा घेऊन झाडीझुडूपाचे आडोशाला एक इसम गावठी हातभट्टी दारूविक्रीचा व्यवसाय करतो अशी विश्वसनीय बातमी मिळाली. त्या बातमीच्या अनुषंगाने पो.नि. श्रीम. जाधव यांचे मार्गदर्शनाखाली ते, सोबत सपोफौ/३९६ बुरटे व दोन पंचांना पोलीस दूरक्षेत्र आंबवली येथे बोलावून हकिगत कळवून एक १८० मिली. मापाची प्लॅस्टीकची बाटली घेऊन खाजगी वाहनाने निघाले. खेड ते शिंदी जाणारे डांबरी रोडवर खोपी गावी खाजगी गाडी थांबवून चक्रवती नदीकिनारी पायवाटेने चालत जात नदीकिनारी जंगलमय झाडीझुडूपात प्रोव्ही वॉच करत असताना एक इसम त्याचे पुढ्यात एक प्लॅस्टीक कॅन घेऊन बसलेला दिसला. त्याचा संशय येताच त्यांनी त्यास १६.०० वाजता जागीच पकडून त्याचे ताब्यातील कॅनची खात्री केली सदर ३५ लि. मापाच्या कॅनमध्ये सु. २२ लि. गावठी हातभट्टीची

दारू आढळून आली. कॅनला उग्र दारूचा वास येत होता. दारूविक्रीचा परवाना आहे अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यास नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव गाव सांगितले. सदर मुद्देमालाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला व कॅनमधील दारू १८० मिली. मापाच्या बाटलीमध्ये नमुना म्हणून रासायनिक विश्लेषणासाठी काढून घेतली. त्या बाटल्यांवर पंचांचे व त्यांचे सह्यांचे लेबल लावून जागीच सिलबंद केले व मुद्देमाल जप्त केला व आरोपीस नोटीस देऊन ते त्यांचे कार्यालयात आले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र.६९/२०२१ दाखल होवून त्याचा पुढील तपास पोहेकॉ/३९६ आर. जी. बुरटे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी मुद्देमाल जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर दिनांक २६/०९/२०२२ रोजी निशाणी क्रं.६ वर गुन्हयाच्या अपराधाचा तपशील नोंदवुन तो आरोपीला समजावून सांगितला असता त्याने अपराध केल्याचे नाकारले आणि खटला चालविण्याची मागणी केली. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निशाणी क्रमांक ६ लगत जबाब नोंदविण्यात आला. त्यामध्ये त्याने त्याचे विरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला.

**०५.** अभियोग पक्ष व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारासाठी घेण्यात आले व त्याखाली दिलेल्या कारणमिमांसे आधारे त्यावर निष्कर्ष नोंदविण्यात आले –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी दिनांक २६/०३/२०२१ रोजी १६.०० वाजता मौजे खेड ते शिंदी जाणारे डांबरी रोडवर खोपी गावी चक्रवती नदीकिनारी झाडांचे आडोशाला ता. खेड, जि. रत्नागिरी येथे सुमारे २२ लि. गावठी हातभट्टीची दारू बेकायदेशीररीत्या व विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळुन आला व त्याप्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| (२) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०६.** आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने भाग क मध्ये नमूद केलेप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत.

### मुद्दे क्रमांक १ व २ बाबत –

**०७.** अभियोग पक्ष साक्षीदार क्र.१ अनिल सुरेश खोपटकर (निशाणी ६लगत)

हे पंच असून त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांना घटना किती तारखेची आहे हे माहित नाही. दि.२६.०३.२०२१ रोजी खेड पोलीस स्टेशनचे पो. हवालदार आर. जी. बुरटे यांनी त्यांना पोलीस ठाणे खेड अंतर्गत दूरक्षेत्र आंबवली येथे बोलावल्यावरून ते तेथे गेले होते. त्याठिकाणी पो. हवालदार बुरटे, ते व आणखी एक पंच होते. तेथून ते खाजगी गाडीने खोपी येथे गेले. खोपी येथील चक्रवती नदीजवळ आरोपी हा एक ३५ लि. मापाचा कॅन घेऊन बसलेला दिसला. त्यास पोलीसांनी पकडून त्याच्याजवळील कॅनचे बूच उघडून वास घेतला असता त्यामध्ये गावठी हातभट्टी दारू होती. त्याचे नाव विचारले असता आरोपीने आपले नाव सांगितले. त्यानंतर प्रत्यंतरासाठी कॅनमधून १८० मिली मापाच्या बाटलीमध्ये नमुना घेऊन त्या बाटलीवर त्यांची व दुस–या पंचांची सही घेतली. घटनास्थळ पंचनामा निशाणी १२ वर आहे.

०८. बचावपक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी बचावपक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. त्यांनी मान्य केले की, त्यांच्या सरतपासात ज्या मुद्देमालाचा उल्लेख केला होता तो मुद्देमाल न्यायालयासमक्ष दाखविण्यात आला नाही. पंचनाम्यात प्लॅस्टीक कॅनचा रंग नमूद नाही. ते ज्या खाजगी वाहनाने गेले होते त्या वाहनाचा नंबर व वाहनाचे मालक कोण याबाबत त्यांना माहित नाही. पुढे १८० मिली. मापाची बॉटल पोलीसांनी कोठून आणली होती किंवा खरेदी केली होती हे त्यांना माहित नाही. त्यांनी उलटतपासादरम्यान सांगितले

की, या आधी त्यांनी ब–याच केसमध्ये पंच म्हणून साक्ष दिलेली आहे. तसेच पोलिसांनी त्यांना बोलावण्यासाठी पत्र पाठविले होते किंवा फोन केला होता हे आठवत नसल्याचे सांगितले. तसेच कळंबणी येथून आंबवली येथे किती वाजता गेले व आंबवली येथून खोपी येथे किती वाजता गेले हे आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले.

०९. प्रस्तूत प्रकरणात दोषसिध्दतेसाठी आरोपीने आरोपी दिनांक २६/०३/२०२१ रोजी १६.०० वाजता मौजे खेड ते शिंदी जाणारे डांबरी रोडवर खोपी गावी चक्रवती नदीकिनारी झाडांचे आडोशाला ता. खेड, जि. रत्नागिरी येथे त्याच्या कब्जात एक ३५ लि. मापाच्या कॅनमध्ये सु. २२ लि. गावठी हातभट्टीची दारू बेकायदेशीररीत्या व विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळुन आला या बाबी अभियोगपक्षाने सिध्द करणे आवश्यक आहे.

१०. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या पुराव्यामधुन अभियोग पक्षाने नि.१२ घटनास्थळ पंचनामा शाबीत केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये फिर्यादी यांचा पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे फिर्याद शाबीत झालेली नाही. सदर प्रकरणामध्ये ज्यांनी जप्त मुद्देमालाचे नमुने रासायनिक प्रयोगशाळेला घेऊन गेले त्यांना अभियोग पक्षाने साक्षीदार म्हणून तपासलेले नाही. त्यामुळे ज्या व्यक्तीने जप्त मुद्देमालाचे नमुने रासायनिक प्रयोगशाळेला घेऊन गेले ते नमुने आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालाचेच होते किंवा नाही हे स्पष्ट होत नाही.

११. सदर प्रकरणामध्ये पंच यांच्या व्यतिरिक्त फिर्यादी, इतर साक्षीदार व तपासी अधिकारी यांचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्धचा दोषारोप सिद्ध करण्यासाठी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच इतर साक्षीदार यांची देखील साक्ष नोंदविणे अभिप्रेत होते. परंतु अभियोग पक्षाला इतर साक्षीदार अथवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यास अपयश आले आहे.

१२. वादाकरीता पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातील मुददेमाल जप्त केला असे जरी गृहीत धरले तरी, जप्त मुद्देमालापैकी एक बाटली सिलबंद करुन ती रासायनिक विश्लेषणासाठी पाठविली होती हे वाहक यांच्या पुराव्याशिवाय संशयापलिकडे शाबीत होत नाही. तसेच अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल न्यायालयामध्ये पुराव्याकामी दाखल केला आहे. जरी अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल केला असला तरी अभियोग पक्षाने प्रकरणामधील जप्त मुद्देमाल हा आरोपीकडूनच घटनास्थळावर जप्त केला गेला व आरोपीकडूनच जप्त करण्यात आलेला मुद्देमाल त्यांनी रासायनिक विश्लेषणाकरीता नेला होता व उपरोक्त अहवाल आरोपीकडुन जप्त केलेल्या दारुचाच होता काय हे स्पष्ट होऊ शकले नाही. तसेच नमुना बाटली सी.ए.कामी पाठविताना ती सिलबंद अवस्थेत होती याबाबतचा वेगळा पंचनामा केलेला नाही.

१३. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने फिर्यादी तसेच तपासी अधिकारी

यांची साक्ष नोंदवलेली नाही. सदर प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल आरोपीकडूनच जप्त केला गेला हे संशयापलिकडे शाबीत होत नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अत्यंत महत्वाचा असा पुरावा की, जो प्रस्तुत आरोपीच्या विरुद्ध दोषारोप निःशंकपणे सिद्ध करु शकतो तो अभियोगपक्षाने या अभिलेखावर आणलेला नाही, जेणेकरुन प्रस्तुत आरोपीच्या ताब्यामध्ये प्रतिबंधीत मुददेमाल मिळुन आला हे स्पष्ट झाले असते. सबब, प्रस्तुत आरोपीने बेकायदेशीररीत्या व विनापरवाना देशी दारु चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगली हे सिद्ध होत नाही.

**१४.** प्रस्तूत प्रकरणातील मुद्देमाल एक ३५ लि. मापाच्या कॅनमध्ये सु. २२ लि. गावठी हातभट्टीची दारू असा मुद्देमाल अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी पाठविणे संयुक्तिक राहील. अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नसल्याने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे–

## आ दे श

१. आरोपी अजित गंगाराम मोहिते याला महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रदद् करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे वैयक्तिक बंधपत्र व जामीन रक्कम रुपये १५,०००/– प्रमाणे जामीनाची पूर्तता करावी. सदरचा जामीन आजपासून सहा महिने वैध राहील.

४. प्रस्तुत गुन्हयातील मुददेमाल अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर केला.)

Digitally signed by SAHIL SALIM MULANI
Date: 2026.07.06 15:47:11 +0530

खेड. (एस.एस.मुलाणी)
दिनांक –०६/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२),
खेड.

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | अनिल सुरेश खोपटकर (सा.क्रं.१) | पंच साक्षीदार | ६ लगत |

**ब. अभियोग पक्ष निशाणी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १२ | घटनास्थळ पंचनामा |

Digitally signed by SAHIL SALIM MULANI
Date: 2026.07.06 15:47:20 +0530

खेड. (एस.एस.मुलाणी)
दिनांक –०६/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२),
खेड.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No. 647-2021 |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J.D.Ambekar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 06.07.2026 |
| Judgment /Order signed by Presiding Officer on | : | 06.07.2026 |
| Judgment /Order uploaded on | : | 06.07.2026 |